महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
२ रा मजला, दालन क्र.२२१ (विस्तार),
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/कार्यासन १२, दिनांक १७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार खालील नमूद वेतन क्षेणीतील राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समितीवरील खाजगी सचिव व स्वीय सहायक यांची पदे प्रतिनियुक्तीने भरावयाची आहे त्यासाठी क्षेत्रीय कार्यालयातील समकक्ष पदावरील अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहे. सदर पदांचे कार्यक्षेत्र मुंबई राहील.

| अ.क्र. | पदनाम | भरावयाचे पदांची संख्या | ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | मंत्रालयीन संवर्गातील समकक्ष पद |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | खाजगी सचिव | १ पद | S-२३-६७७००-२०८७०० | अवर सचिव |
| २ | स्वीय सहायक | २ पदे | S-१४-३८६००-१२२८००<br>S-१७-४७६००-१५११०० | सहायक कक्ष अधिकारी |

कामाचे स्वरुप खालीलप्रमाणे दर्शविण्यात आला आहे.

१. **खाजगी सचिव:** अध्यक्षांना कामात सहाय करणे, त्यांचे दौरे व बैठका आयोजित करणे व बैठकीत घेतलेले निर्णय सदस्यांना कळवावे.
२. स्वीय सहायक: मा. अध्यक्ष, राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समिती वेळोवेळी निदेश देतात त्या प्रमाणे पत्र व्यवहार करुन त्याचा पाठपुरावा करणे, अन्य नियमाप्रमाणे असणारी सर्व कार्यालयीन कामे.

नियुक्तीच्या अटी व शर्ती: शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/ कार्यासन १२, दिनांक १७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार नियुक्ती करण्यात येईल. इच्छुक (मंत्रालय वगळून क्षेत्रीय कार्यालयातील ) अधिकारी/कर्मचारीयांनी त्यांचे अर्ज मा. सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग या पत्त्यावर दिनांक १५/८/2021 संध्याकाळी ५.०० वाजे पर्यंत पहोचतील अशा प्रकारे सादर करावेत.